मराठी

ग्र. क्रं. ७ **शनिमाहात्म**

त्रुटीत
ओवीसंख्या २९ ते ६२
पृ. २ ते २१.
१९.०८.२००८

“ Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.”

आहे ज्यास नीट ॥ सर्व मार्ग सुचती सुभट ॥ कोणत्या कार्यासही तूट ॥ तो न करी कल्पांतीं ॥ २९ ॥ बुधाची बुद्धि भारी ॥ कोणासी निष्ठुरता न करी ॥ संसारचिंता हरी ॥ प्राणिमात्रांची ॥ ३० ॥ मग बोले पांचवा पंडित ॥ गुरुचें सामर्थ्य असे अद्भुत ॥ गुरु तो श्रेष्ठ सर्वांत ॥ इंद्रादिदेवां समस्तां ॥३१॥ गुरुज्ञानाचा न कळे पार ॥ भाविकांसी तो करुणाकर ॥ कर्माकर्माचा करी चूर ॥ भवभयव्यथेसी ॥ ३२ ॥ दुःख आणि दारिद्र्य रोग ॥ स्मरणमात्रें होय भंग ॥ नवग्रहांत महायोग्य ॥ ऐसा जाणिजे ॥ ३३ ॥ गुरु जातीचा असे ब्राह्मण ॥ सर्वांत श्रेष्ठ असे वर्ण ॥ सर्व देव करिती मान्य ॥ गुरुवचनासी ॥ ३४ ॥ गुरु असे ज्ञानाचा पुरा ॥ तयाच्या साम्यासी नसे दुसरा ॥ त्यापुढें नुरेचि थारा ॥ कल्पनेचा कदाही ॥ ३५ ॥ ह्मणोनि करितां गुरुसेवा ॥ मग ग्रहांचा कोण केवा ॥ गुरु सर्वभावें भजावा ॥ तेणें संतोष सर्व ग्रहांसी ॥३६॥ शिव करी गुरुपूजनासी ॥ तेथें पाड काय इतरांसी ॥ ऐका श्रेष्ठ तो सर्वांसी ॥ आगमागम ॥ ३७॥ तंव सहावा पंडित बोलिला ॥ शुक्रग्रह असे बहु भला ॥ जेणें राक्षसां उपकार केला ॥



Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yeshwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

निशिराज महारूपस ।। षोडश कळा जयासी ।। १९ ।। तो न गांजीच को-
णासी ।। अति सौख्यदाता सर्वांसी ।। सदासर्वदा निर्मळ मानसीं ।। धन्य
जयाचें पूजन ।। २० ।। मग तिसरा पंडित बोलत ।। ऐक राया सुनिश्चित ।।
मंगळ तो महासमर्थ ।। कथा ऐक तयाची ।। २१ ।। मंगळ ग्रह महा-
क्रूर ।। जैसी कां ते खड्गाची धार ।। तयाचा न कळे पार ।। सर्वग्रहांमाजी
वरिष्ठ हा ।।२२।। मंगळ ग्रह सोनार ।। क्रूरता जयाची अति थोर ।। परि तो
पूजकासी कृपाकर ।। मंगल करी सर्वदा ।। २३ ।। जे गर्वे धरूनि पूजा न
करिती ।। मग तो खवळे उग्रमूर्ती ।। विलया जाय संतती संपत्ती ।। शेवटीं
नाश करी जीवित्वाचा ।। २४ ।। तोचि पूजकासी सदा प्रसन्न ।। सर्व अर्थ
करी पावन ।। सर्व दुःख निरसून ।। अंतकाळी संरक्षी ।।२५।। तंव बोले चव-
था पंडित ।। बुध असे महाबळवंत ।। बुधाचा प्रताप अद्भुत ।। सर्व ग्रहांमाजी
।। २६ ।। बुध जातीचा असे वाणी ।। नवग्रहांत शिरोमणी ।। विघ्नें नासती
तयाच्या पूजनीं ।। सर्वानंद प्राप्त करी ।।२७।। बुध ज्यावरी कृपा करी ।। लक्ष्मी-
वंत त्यासी करी ।। ऐसा तो महापरोपकारी ।। बुधग्रह जाणिजे ।।२८।। बुधग्रह

"A Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

संजीवनीमंत्रें करोनी ॥ ३८ ॥ शुक्र गुरु तो दैत्यांचा ॥ त्रिभुवनीं धाक वाहती जयाचा ॥ पार न कळे सामर्थ्याचा ॥ ह्मणोनि श्रेष्ठ तो ॥ ३९ ॥ शुक्राची शक्ति आहे फार ॥ तो करी कर्माकर्मांचा चूर ॥ विघ्नें पळती दूरच्या दूर ॥ शुक्राचें नाम घेतां ॥ ४० ॥ शुक्रपूजनीं जे तत्पर ॥ त्यांच्या शौर्यासी नाहीं पारावार ॥ जो दिव्यदेही निरंतर ॥ एकाक्ष तो ॥४१॥ आधि व्याधि दुःख दरिद्र ॥ स्मरणमात्रें होय दूर ॥ सर्वाभीष्ट परिकर ॥ प्राप्त करी पूजका ॥४२॥ नवग्रहांत शिरोमणी ॥ ज्याचा महिमा वर्णिला पुराणीं ॥ मान्यता श्रेष्ठ सर्वांहूनी ॥ शुक्राची असे जाणपां ॥४३॥ ऐसे हे सहा ग्रह ऐकोनि राजा ॥ तजनी मस्तक डोलवी बोजा ॥ ह्मणे उत्तम कथिलें काजा ॥ अखंडित यांतें स्मरावें ॥ ४४ ॥ आणिक ग्रह राहिले कोण ॥ सांगा पंडित हो निवडून ॥ कैसीं तयांचीं नामें खूण ॥ त्या मूर्तींसीं बोलिजे ॥ ४५ ॥ मग संकेतें बोले पंडित ॥ राहु आणि दुसरा केत ॥ हे उभयतां अतिअद्भुत ॥ दैत्यकुळींचे असती ॥४६॥ मातंग जातीचे दोन्ही॥दुष्ट क्रिया ह्मणवोनी ॥ त्यांच्या दर्शनें चंद्रसूर्य गगनीं ॥ चळचळां कांपती ॥ ४७ ॥

राहू पीडी चंद्रासी ॥ केतु तो सूर्यासी ॥ ग्रहण बोलिजे तयासी ॥ प्रत्यक्ष
दृष्टीसी दिसतसे ॥ ४८ ॥ प्राणिमात्र सर्वजन ॥ त्यांसी न सांडिती पीडेवि-
ण ॥ परी केलिया पूजनस्मरण ॥ किंचित् पीडा करिताती ॥ ४९ ॥ राहु
महापीडक अनिवार माया ॥ तद्रूपचि केतु जाण राया ॥ उभयतांची एक
चर्या ॥ पूजनस्मरणें संतोषती ॥ ५० ॥ सर्व ग्रहांपरीस अतिक्रूर ॥ जनासी
पीडा करिती फार ॥ ह्मणोनि पूजनस्मरण निरंतर ॥ राहुकेतूंचें करावें ॥ ५१ ॥
तंव नववा पंडित बोलत ॥ शनिग्रह श्रेष्ठ अवघ्यांत ॥ बलाढ्य होय अतिअ-
द्भुत ॥ न कळे कळा तयाची ॥ ५२ ॥ तो ज्यावरी करी कृपा ॥ त्यासी सर्व
मार्ग असे सोपा ॥ ग्रह दिक्पाळांवर छापा ॥ तया शनिग्रहाचा ॥ ५३ ॥
ज्यावरी तो कोपासी चढे ॥ तयावरी नाना विघ्नें येत रोकडे ॥ तयाचा संसार
बिघडे ॥ न राहे कल्पांतीं ॥ ५४ ॥ शनिदेव महाक्रोधी ॥ ज्याचा पराजय
नोहे युद्धीं ॥ देवदानवां त्रिशुद्धी ॥ दुःखदाता शनिदेव ॥ ५५ ॥ जो कां भा-
विक सज्ञान नर ॥ तो या ग्रंथाचा करी आदर ॥ पूजनस्मरण निरंतर ॥ त्यावरी
कृपा करी शनिदेव ॥ ५६ ॥ शनैश्चराची मूर्ति काळी ॥ तो जातीचा असे तेली ॥



" Joint Project of Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

चरण पंगु सुरत चांगली ॥ पूजा करी काळभैरवाची ॥५७॥ त्याची दृष्टि पडे जयावर ॥ करी तयाचा चकनाचूर ॥ अथवा कृपा करी जयावर ॥ तयासी सर्व आनंद प्राप्त होय ॥ ५८ ॥ दृष्टीचा ऐका चमत्कार ॥ जन्मला जेव्हां शनैश्वर ॥ तेव्हां दृष्टि पडली पित्यावर ॥ तेणें कुष्ट भरला सर्वांगीं ॥ ५९ ॥ पित्याच्या रथीं होता जो सारथी ॥ तो पांगुळ झाला निश्चितीं ॥ अश्वांचिया नेत्रांप्रती ॥ अंधत्व आलें तत्क्षणीं ॥ ६० ॥ तेव्हां त्यांनीं उपाय केले फार ॥ परी गुण न येचि अणुमात्र ॥ जंव दृष्टि फिरवी शनैश्वर ॥ तंव तिघेही आरोग्य जाहले ॥ ६१ ॥ ऐसें ऐकतां राजा विक्रम ॥ हांसूनि बोले सप्रेम ॥ ह्मणे पुत्र जन्मोनी काय काम ॥ ऐसा अपवित्र जो ॥६२॥ तो पुत्र नव्हे केवळ वैरी ॥ जो उपजतांच ऐसें करी ॥ पुढें तो काय न करी ॥ सांगा पंडित हो ॥६३॥ ऐसें बोलिला हांसोन ॥ करीं टाळी वाजवी गर्जोन ॥ सभेसी विनोदवचन ॥ ह्मणे हा पुत्र कैसा हो ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां तये अवसरीं ॥ कैसी वर्तली नवलपरी ॥ ती ऐकावी आतां चतुरीं ॥ चित्त देऊनियां ॥६५॥ त्या समयीं शनिदेव विमानीं ॥ जात होते बैसोनी ॥ रायाचें

वाक्य ऐकतां तत्क्षणीं ॥ विमान खालीं उतरलें ॥६६॥ अकस्मात येऊनि-
यां सभेंत ॥ बैसले तेव्हां विमानासहित ॥ तंव पाहते झाले सभापंडित ॥
ह्मणती आले शनिदेव ॥ ६७ ॥ मग राव उठे झडकरोनी ॥ जाऊनि
नमन करी चरणीं ॥ तंव टाकिला झिडकारोनी ॥ शनिदेवानें ॥ ६८ ॥
ह्मणे तूं राजा ऐसा मस्त ॥ टवाळी करिसी अद्भुत ॥ याचा चमत्कार क्ष-
णांत ॥ दावीन पाहें आतांचि ॥ ६९ ॥ तूं फार करितोसि टवाळी ॥
नसतीच चढविली कळी ॥ तरी कन्याराशीस मुळीं ॥ तुजला ग्रह मी आ-
लों ॥ ७० ॥ तरी आतां पाहें माझा चमत्कार ॥ तूं नको करूं गर्व फार ॥
ऐसें वदोनि अतिसत्वर ॥ विमानारूढ पैं झाला ॥७१॥ तंव तो राव लागे
चरणांसी ॥ ह्मणे कृपा करावी दीनासी ॥ अन्याय घालीं पोटासीं ॥ कृपा-
ळुवा शनिदेवा ॥७२॥ तरी तो न मानीच शनिदेव ॥ ह्मणे तुज दाखवीन
अनुभव ॥ तेव्हां मनीं खिन्न जाहला राव ॥ चिंता मानसीं फार करी
॥ ७३ ॥ मग ह्मणतसे पंडितांला ॥ आह्मीं महाग्रह उगाचि छळिला ॥
तो आतां कष्टवील आह्मांला ॥ तरी कैसें करावें आतां ॥ ७४ ॥ जें जें पुढें
होणार ॥ ह्मणोनि बुद्धि सुचे तदनुसार ॥ तरी जें असेल लिखिता-

क्षर ॥ तैसें आतां होईल ॥ ७५ ॥ राव दिलगीर जाहला मानसीं ॥ विस-
र्जन करी सभेसी ॥ जाता जाहला मंदिरासी ॥ कांहीं अंतरीं सुचेना॥७६॥
करूनियां संध्यास्नान ॥ मग करीतसे भोजन ॥ तदनंतर करिता जाहला
शयन ॥ नावेक पलंगावरी ॥७७॥ ऐसें करितां एक मास ॥ जाहला राया
विक्रमास ॥ मग काय वर्तलें त्या कथेस ॥ तेंचि आतां ऐकिजे ॥ ७८ ॥
राया विक्रमासी आला शनी ॥ बारावा अति क्रूरस्थानीं ॥ जेणें त्रासिले
बहुत प्राणी ॥ अभाविकां पीडितसे ॥ ७९ ॥ तेव्हां पंडित बोलती वाचे ॥
राया पूजन करीं शनिग्रहाचें ॥ साडेसात वर्षे नेमाचें ॥ सामर्थ्य आहे जा-
णिजे ॥ ८० ॥ तुह्मी विनोदें हांसलां शनीसी ॥ तरी तो कष्टवील तुह्मां-
सी ॥ जो कां गांजितो त्रैलोक्यासी ॥ तोचि महाग्रह जाणिजे ॥ ८१ ॥
चित्त करोनियां एकाग्र ॥ ऐकावा पूजेचा प्रकार ॥ जेणंकरोनि शनैश्वर ॥
कृपा करील तुह्मांवरी ॥ ८२ ॥ प्रथम करोनि औषधि स्नान ॥ मग करावें
प्रतिमेचें पूजन ॥ अश्वाचा नाल घेऊन ॥ त्याची प्रतिमा करावी ॥ ८३ ॥
शास्त्रविधी पूजा निर्धार ॥ मग तैल अभिषेक कर ॥ मृत्तिकेच्या कुंभावर ॥ २

Joint Project of Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

त्याची स्थापना करावी ॥८४॥ स्थापना झालिया जाण ॥ पूगीफल ब्राह्म-
णासी देऊन ॥ तेवीस सहस्र जप संपूर्ण ॥ यथासांग करावा ॥८५॥ जपसंख्या
जाहलियावरी ॥ चतुर्थांश हवन करी ॥ हवन झालियाउपरी ॥ दानें करावीं
शनीचीं॥८६॥ मग जपकर्त्या ब्राह्मणासी ॥ शनैश्वररूप मानूनि त्यासी ॥
दक्षिणा देऊन पूजेसी ॥ प्रसन्नचि करावें ॥ ८७ ॥ मग करावें ब्राह्मणभो-
जन ॥ यथाशक्ति द्यावें दान ॥ ब्राह्मण तृप्त होतां पूर्ण ॥ संतोष पावे
शनिदेव ॥ ८८ ॥ जवीं रक्षी बाळकासी माता ॥ तैसें रक्षी निज-
भक्ता ॥ पंडित ह्मणती राया समर्था ॥ गोष्टी एवढी ऐकावी ॥ ८९ ॥
राजा ह्मणे पंडितांला ॥ शनि न मानीच आह्मांला ॥ तोचि माता पिता
वहिला ॥ रक्षी तोचि पैं जाणा ॥ ९० ॥ मग बोले विक्रम पंडितांसी ॥
तुह्मीं जावें आपुल्या गृहासी ॥ जें होणार असेल तें निश्चयेसीं ॥ घडूनि
येईल न टळेचि ॥९१॥ ऐसें बोलोनियां उत्तर ॥ काय जाहला चमत्कार ॥
चित्त करोनियां स्थिर ॥ श्रवण करावें सर्वही ॥ ९२ ॥ असो मग
कोणे एके दिवशीं ॥ दोन प्रहरांच्या समयासी ॥ कारवानवेषें उज्जनीसी ॥



Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

घोडे विकावया आला शनिदेव ॥ ९३ ॥ रूप पालटोनी आपुलें ॥ वारु विकावया आणिले ॥ तंव तेथें गिऱ्हाईक पातले ॥ रावही आला त्या स्थानीं ॥ ९४ ॥ तेव्हां किंमत पुसतसे रावो ॥ तयासी ह्मणे शनिदेवो ॥ वारु फिरवूनि पहा हो ॥ मग कळेल मोल तयाचें ॥ ९५ ॥ तेव्हां सारंगा वारू राव आणवित ॥ चाबुकस्वारासी वरी बैसवित ॥ तेणें घोडा फिविला चौगानांत ॥ अति उत्तम फिरतसे ॥ ९६ ॥ तंव दुसरा घोडा अबलख ॥ त्याचें मोल रुपये लक्ष एक ॥ तो सोडूनि तात्काळिक ॥ आणिला विक्रमापाशीं ॥ ९७ ॥ तंव त्या सौदागरें काय केलें ॥ राया विक्रमासी बैसविलें ॥ घोडा फिरवितां राव बोले ॥ अति उत्तम फरतसे ॥ ॥ ९८ ॥ तंव त्या घोड्यासी कोरडा मारितां ॥ तेव्हां घोडा उडाला गगनपंथा ॥ पवनवेगें वारू जातां ॥ महावनांत ते समयीं ॥ ९९ ॥ अधिक कोरडा मारितां ॥ तों तों अधिक जाय गगनपंथा ॥ थोर अवस्था होय चित्ता ॥ केवीं वर्तलें ह्मणवोनी ॥ १०० ॥ दूरदेश अतिउजाडी ॥ जेथें घोर वन महाझाडी ॥ तेथें नदीच्या पैलथडी ॥ घोडा जाऊनि उतरला ॥

"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

॥ १ ॥ तेथें राव उतरला खालीं ॥ तंव नवलपरी वर्तली ॥ वारु नाहीं
नदी गुप्त झाली ॥ झाडाझुडांसहित ॥ २ ॥ तेव्हां आश्चर्य वाटलें वि-
क्रमासी ॥ ह्मणे ईश्वरी गति न कळे कोणासी ॥ वारु आणि वनासी ॥
काय विचार पैं जाहला ॥ ३ ॥ तंव अस्तासी पावला वासरमणी ॥ अंध-
कार प्रवर्तली रजनी ॥ पुढें मार्ग न दिसे नयनीं ॥ मग तेथेंचि पहुडला ॥
॥ ४ ॥ चार प्रहर गेलियावरी ॥ उदयासी आला तमारी ॥ मग तो एका
नगराचा मार्ग धरी ॥ राजा विक्रम आपण ॥ ५ ॥ तंव तेथोनि चार यो-
जनें दूरी ॥ तामलिंदा नाम नगरी ॥ तेथें जाता जाहला ते अवसरीं ॥
हळू हळू पोहोंचला ॥ ६ ॥ इकडे उज्जनीची कथा राहिली ॥ ती आतां
पाहिजे श्रवण केली ॥ नगरजनांनीं वाट पाहिली ॥ चार प्रहर रायाची
॥ ७ ॥ तेव्हां सौदागर ह्मणे प्रधासी ॥ वारु द्यावा आमुचा आह्मांसी ॥
कोणीकडे नेलें वारुसी ॥ राया विक्रमानें ॥ ८ ॥ तंव पाहते झाले नगरा-
बाहेर ॥ कोसीं दो कोसीं कोस चार ॥ परी कोठें न दिसे राजेश्वर ॥ मग
चिंता प्रवर्तली ॥ ९ ॥ तेव्हां सौदागर ह्मणे प्रधानासी ॥ सत्वर शोधूनि आणा
रायासी ॥ नाहीं तरी आह्मांसी ॥ पैका द्यावा वारुचा ॥ १० ॥ तेव्हां प्रधानासी



Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

पडली चिंता ॥ मनीं ह्मणे कैसें करावें आतां ॥ रायाचा शोध न लागे तत्त्वतां ॥ सौदागरें अडविलें ॥ ११ ॥ मग प्रधानानें काय केलें ॥ सौदागरासी बोलाविलें ॥ ह्मणे दारूचें मोल काय वहिलें ॥ तें सांगा आह्मांसी ॥ १२ ॥ तयानें मोल सांगतांचि झडकरी ॥ मग पैका वातला तयाचे पदरीं ॥ तेव्हां प्रधानासी पुसोनि सत्वरीं ॥ जाता झाला शनिदेव ॥ १३ ॥ सौदागर गेलिया पाठीं ॥ मागें काय वर्तली गोष्टी ॥ नगरजन सर्व होती कष्टी ॥ देश पट्टणें धुंडिलीं ॥ १४ ॥ नगरीं झाली ऐसी परी ॥ इकडे राजा विक्रम काय करी ॥ तया तामलिंदापूर नगरीं ॥ ग्रामामाजी प्रवेशला ॥ १५ ॥ तंव तेथें व्यवहारी सावकार ॥ जातीचा वैश्य धनाढ्य थोर ॥ तेव्हां तयाचे दुकानावर ॥ राजा नावेक स्थिरावला ॥ १६ ॥ सावकाराचे दुकानीं ॥ विक्री होतसे द्विगुणी ॥ त्याणें भला माणुस जाणोनी ॥ आदर केला तयाचा ॥ १७ ॥ मग व्यवहारी बोले भावें ॥ तुह्मी अतां मुखमार्जन करावें ॥ जातीचे कोण आह्मां सांगावें ॥ नामग्राम तुमचें पैं ॥ १८ ॥ राजा ह्मणे तया वैश्यासी ॥ आह्मीं क्षत्रिय असों परियेसीं ॥ आमुचा मुलुख दूरदेशीं ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

क्षण एक येथें उतरलों ॥ १९ ॥ मग सावकारें करविला पाक ॥ अतिउ-
त्तम षड्रसादिक ॥ भात पुऱ्या सांडगे देख ॥ करविले बहुत प्रकार ॥१२०॥
मग तो वैश्य ह्मणे क्षत्रिया ॥ उठा वेगीं जेवावया ॥ भोजन करोनि ल-
वलाह्यां ॥ मग जावें सुखरूप ॥ २१ ॥ मग राव करी संध्यास्नान ॥
सत्वर सारिता झाला भोजन ॥ उत्तम प्रकारचें पक्वान्न ॥ सेवूनि तृप्ति पा-
वला ॥ २२ ॥ तेव्हां वैश्य ह्मणे क्षत्रियासी ॥ सत्य सांगावें आह्मांसी ॥
मग विक्रमें यथार्थ कथिलें तयासी ॥ तेव्हां तो निज अंतरीं समजला ॥
॥ २३ ॥ आतां त्या सावकाराची कन्यका ॥ नाम तिचें अलालिका ॥
तिचा पण हाचि देखा ॥ इच्छिला वर वरावा ॥ २४ ॥ परी तिसी न मिळे
इच्छावर ॥ वैश्य शोध करी निरंतर ॥ तव हा विक्रमराजा परिकर ॥ ह्मणे
यासी द्यावी कुमारिका ॥ २५ ॥ तेव्हां तो बोले कुमारिकेसी ॥ बाई उत्तम
वर आणिला तुजसी ॥ आतां तूं माळ घालीं यासी ॥ न करी अनुमान
॥ २६ ॥ हा स्वरूपें आहे सुंदर ॥ बत्तीस लक्षणी परिकर ॥ हा भाग्यवंत
जाण वर ॥ यासी वरीं कुमारिके ॥ २७ ॥ तेव्हां कुमारी बोले पित्यासी ॥



"a project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai"

तुह्मी बहुत वर्णितां यासी ॥ परी न भरतां मम मानसीं ॥ न वरीं त्यासी निर्धारीं ॥ २८ ॥ आज पाहीन याचें लक्षण ॥ कैसें चातुर्य काय ज्ञान ॥ भाषणावरूनि प्रमाण ॥ सर्व कळों येईल ॥ २९ ॥ ऐसें वदतां जाहली सांज ॥ तंव अस्तासी गेला भानुराज ॥ पित्यासी ह्मणे महाराज ॥ पांथिकासी पाठवावें ॥१३०॥ मग वैश्य ह्मणे क्षत्रियासी ॥ जावें निद्रा करावयासी ॥ अति रम्य चित्रशाळेसी ॥ तेथें सर्व विदित होईल ॥ ३१ ॥ मग तो विक्रम उठोनि चालिला ॥ जेथें होती चित्रशाळा ॥ तेथें हंस मयूर कोकिळा ॥ नाना प्रकारचे लेपिले ॥ ३२ ॥ चित्रें रेखिलीं बहुत कुशलता ॥ वारू आणि गजरथा ॥ चित्रकारें चित्र रेखितां ॥ आळस कांहीं न केला ॥ ३३ ॥ पुढें पाहे राजा नयनीं ॥ तंव अपूर्व मंचक देखिला तत्क्षणीं ॥ त्यावर पासोडा लेप दोन्ही ॥ आंथरुण घातलेंसे ॥ ३४ ॥ रत्नखचित सुरंग पलंग ॥ त्यावरी नानापरीचे रंग ॥ जाई जुई पुष्पें सुरंग ॥ सेज केली अति निगुती ॥ ३५ ॥ वरती लोंबती मोतियांचे घड ॥ चांदवा करीतसे फडफड ॥ समया जळती धडधड ॥ चतुष्कोणीं चार पैं ॥ ३६ ॥

ऐसें पाहूनि राव झाला चकित ॥ ह्मणे न कळे काय आहे वृत्तांत ॥ हा कोण देश कोणती गत ॥ होईल तो कळेना ॥ ३७ ॥ कर्माच्या गति अस-ती गहना ॥ जें जें होणार तें कदा चुकेना ॥ तें तें भोगिल्याविण सुटना ॥ देवादिकां सर्वांसी ॥ ३८ ॥ तरी हें शनिदेवाचें छळण ॥ त्याणें हो माया रचिली जाण ॥ आतां होणार तें होय आपण ॥ जो सर्वांसी पीडितसे ॥ ॥ ३९ ॥ ऐसा मनीं करोनी विचार ॥ मग निद्रा करी राजेश्वर ॥ तया पलंगीं साचार ॥ सावधान निजे अंतरीं ॥ १४० ॥ नाना परीचे करी वि-चार ॥ बुद्धीचे तरंग अपार ॥ म्हणोनि निद्रा न ये साचार ॥ परी मुख आच्छादन केलेंसे ॥ ४१ ॥ रायें केली ऐशी परी ॥ मग वैश्यकन्यका काय करी ॥ पंचारती घेऊनि करीं ॥ आली रंगमहालाकारणें ॥ ४२ ॥ तिणें केला सर्व शृंगार ॥ गळां शोभती मोतियांचे हार ॥ केशर कस्तूरी कर्पूर ॥ सुगंध द्रव्यें आणिलीं पैं ॥ ४३ ॥ पायीं पैंजण नेपुरें ॥ तीं झण-त्कार करिती गजरें ॥ पदकांसी जडिले दिव्य हिरे ॥ त्यांचें तेज फांकतसे ॥ ॥ ४४ ॥ ती जैसी पुतळीच केवळ ॥ बत्तीसलक्षणी वेल्हाळ ॥ मृगनयना



Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

विशाळ भाळ ॥ येऊनि उभी ठाकली ॥४५॥ राव निद्रेचें मिष करून ॥ पलंगी
पहुडलासे जाण ॥ तो न उठे ऐसें जाणोन ॥ मग कुमारी काय करी ॥४६॥
चंदनपात्र घेऊनि हातीं ॥ अलोलिका होय शिंपिती ॥ तरी जागा न होय
नृपती ॥ कोणेही प्रकारेंकरोनो ॥ ४७ ॥ ऐसी एक प्रहर झाला
कष्टी ॥ जागा न होय मग झाली हिंपुटी ॥ मुक्ताहार ठेवूनि खुंटी ॥
निद्रा करी सचिंत ॥ ४८ ॥ तंव निद्रा आली कामिनीसी ॥ मग राव उघ-
डितां मुखासी ॥ विचार करी निज मानसीं ॥ मी सत्वधीर ह्मणवितों
॥ ४९ ॥ परोपकारी माझें मन ॥ पापास भितों रात्रंदिन ॥ ही तंव कन्या
असे जाण ॥ कैसें भाषण करावें ॥ १५०॥ ऐसा विचार करी निजमानसीं ॥
तंव ती निद्राभर कामिनीसी ॥ मग पाहता झाला चित्रासी ॥ तेथें
अपूर्व वर्तलें ॥ ५१ ॥ चित्रींचा हंस निर्जीव ॥ परी तो काय करिता झाला
लाघव ॥ खालीं उतरोन सावयव ॥ हाराचीं मोत्यें भक्षितसे ॥ ५२ ॥
राव पाहूनि झाला चकित ॥ मनीं ह्मणे हे आश्चर्य मात ॥ परी ही गोष्ट
अनुचित ॥ दुःखदायक आपणासी ॥ ५३ ॥ जरी हार द्यावा काढूनी ॥

तरी बिरुद जातसे निरसूनी ॥ परासी दुःख न द्यावें ह्मणोनी ॥ बिरुद
असे माझें हें ॥ ५४ ॥ परंतु गोष्टी हे अघटित ॥ आपणासी दुःख होईल
प्राप्त ॥ हें ग्रहदशेचें मान सत्य ॥ परी हार न काढावा ॥ ५५ ॥ ऐसा नि-
श्चय रायें केला ॥ इकडे सर्व हार हंसें गिळिला ॥ तें पाहून राव निजला ॥
कुमारिके शेजारीं ॥ ५६ ॥ तंव उगवला असे दिन ॥ कुमारी उठली
खडबडोन ॥ ह्मणे हा पित्यानें वर आणिला जाण ॥ अतिमूर्ख नपुंसक
॥ ५७ ॥ मनीं क्रोध आला भारी ॥ उठोनी चालिली झडकरी ॥ तंव तो
हार पाहे खुंटीवरी ॥ तेथें कांहीं दिसेना ॥ ५८ ॥ हार न देखे कुमारिका ॥
ती ह्मणे पांथिका अविवेका ॥ हार घेवोनि महाठका ॥ निद्रा केली सुख-
रूप ॥ ५९ ॥ तरी हार देई माझा झडकरी ॥ तुज पचणार नाहीं चोरी ॥
ऐसिया गोष्टीनें तुझी थोरी ॥ राहणार नाहीं तत्वता ॥ १६० ॥ तरी हार
दे माझा मजप्रती ॥ मग त्वां जावें आपुल्या पंथीं ॥ याची चर्चा झालिया
निश्चितीं ॥ नाश होईल शरीराचा ॥ ६१ ॥ तंव पांथस्थ ह्मणे कुमारिका ॥
हार नाहीं आह्मांसी ठाउका ॥ येथें निद्रा केली ह्मणोनि देखा ॥ आळ

घालिसी आह्मांवरी ॥ ६२ ॥ तंव ती कुमारी संतप्त मनीं ॥ पित्यासी सांगे तत्क्षणीं ॥ ह्मणे इच्छावर आणिला मजलागुनी ॥ त्याचें लक्षण अतिउत्तम ॥ ६३ ॥ तुह्मीं ठक चोर आणिला घरा ॥ तो तस्करविद्येमाजी पुरा ॥ तेणें चोरिलें माझिया हारा ॥ तरी तो मागूनि घेइजे ॥ ६४ ॥ तेव्हां वैश्य ह्मणे पांथिकासी ॥ तुज विश्राम दिधला कासयासी ॥ तरी तूं कां हार घेऊनि बैसलासी ॥ बरा झालासी उतराई ॥ ६५ ॥ उत्तम भोजन दिधलें देखा ॥ आणि ही अर्पिली निजकन्यका ॥ ऐसें असतां महामूर्खा ॥ हें काय आचरलासी ॥ ६६ ॥ बराच फेडिला उपकार ॥ देई माझे कन्येचा हार ॥ मग त्वां जावें सत्वर ॥ आलिया पंथें ॥६७॥ तंव राव ह्मणे साव-कारासी ॥ तुमचा हार नाहीं मजपाशीं ॥ हा कर्मभोग ओढवला सायासीं ॥ नसतेंच विघ्न हें ॥ ६८ ॥ तेव्हां सावकारासी क्रोध आला ॥ तेणें सेव-कांसि हुकूम केला ॥ बंधन करावें या तस्कराला ॥ मार द्यावा निष्ठुरपणें ॥ ६९ ॥ यासी मारिल्यावांचून ॥ हार हस्तगत न होय जाण ॥ हा पक्का तस्कर ह्मणोन ॥ ऐसें लक्षण पैं याचें ॥ १७० ॥ मग त्या सेवकीं धांवोनि

सत्वर ॥ बांधिला तो मुशाफर ॥ अतिशयें दिधला मार ॥ दया नाहीं अं-
तरीं ॥ ७१ ॥ ते मारिती निष्ठुर होऊनी ॥ दया नाहीं अंतःकरणीं ॥ मारा
मारा ऐशा वचनीं ॥ वैश्य तेव्हां बोलत ॥७२॥ मार मारून केला जर्जर ॥
ह्मणती हार देईं गा सत्वर ॥ महानिर्दय निष्ठुर ॥ दया न ये कोणासी ॥
॥ ७३ ॥ मग राव ह्मणे वैश्यासी ॥ हार नाहीं गा आह्मांपाशीं ॥ कष्ट-
वितोसि शरीरासी ॥ वृथाचि जाण कासया ॥७४॥ तैं वैश्य ह्मणे सेवकांला॥
हा पक्का तस्कर नव्हे भला ॥ अद्यापि नाहीं कबूल आला ॥ मार खातो
निःशंक ॥७५॥ मग तो व्यवहारी काय करी ॥ जाऊनि रायाचे दरबारीं ॥
राया चंद्रसेना श्रुत करी ॥ सांगे सकळ वर्तमान ॥ ७६ ॥ तें ऐकोनि राजे-
श्वर ॥ ह्मणे आणावा तो तस्कर ॥ ऐसें वचन ऐकोनि सत्वर ॥ सेवकां वी
मांदी धांवली ॥ ७७ ॥ त्यांनीं बंधन करोनि विक्रमासी ॥ आणिते
झाले रायापाशीं ॥ मग प्रणिपात केला वेगेंसी ॥ सन्मुख उभा राहिला
॥७८॥ मग राव बोले पांथिकासी ॥ हार आहे कीं तुजपाशीं ॥ तो देईं आतां
सावकारासी ॥ प्राण वांचवीं आपुला ॥ ७९ ॥ तंव विक्रम बोले वचना ॥



Joint property of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

ऐक राया चंद्रसेना ॥ हार घेतला नाहीं जाणा ॥ असत्य न बोलें कदाही ॥
॥ १८० ॥ हाराचा सांगावा विचार ॥ तरी वृथा ह्मणाल तुह्मीं सर्व ॥ न
घडे तोचि विचार ॥ घडला असे समर्था ॥ ८१ ॥ आह्मांसी ग्रह नाहीं
सानुकूळ ॥ नसती उत्पन्न होते कळ ॥ त्याची काय करून हव्हळ ॥ हो-
णार तें होतसे ॥ ८२ ॥ बरें चोरी न करावी परंतु केली ॥ परी आतां
पाहिजे क्षमा केली ॥ सर्व अपराध पोटीं घालीं ॥ कृपा करीं महाराजा ॥
॥ ८३ ॥ ऐसें वचन ऐकतां राजेश्वर ॥ क्रोधें संतप्त जैसा खदिरंगार ॥
गर्जना करोनि सत्वर ॥ काय बोलता जाहला ॥ ८४ ॥ सेवकांसि ह्मणे
उठा सत्वर ॥ तोडा याचे चरण कर ॥ टाकून द्या नगराबाहेर ॥ अन्न उदक
न द्यावें ॥ ८५ ॥ ऐसा रायाचा अविवेक ॥ मूढमती ते सकळिक ॥ नाहीं
कोणीही भाविक ॥ यथा राजा तथा प्रजा ॥ ८६ ॥ तरी रायाचे मुखीं श-
नैश्वर ॥ सुचूं न दे कांहीं विचार ॥ तोचि पीडा करी वारंवार ॥ दुःख देत
रायातें ॥ ८७ ॥ एसें चंद्रसेनाचें उत्तर ऐकोनी ॥ सेवक उठले झडकरोनी ॥
रायाविक्रमासि चालिले घेऊनी ॥ तया नगराबाहेर ॥ ८८ ॥ नेऊनियां

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com